# फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११/२०२४
## पुनम तांबे व इतर वि. जितेंद्र तांबे
## नि. ०५ वर आदेश
## (दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी पारीत)

सदरचा अर्ज अर्जदारांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ अन्वये अंतरीम खावटीची रक्कम मिळण्याकरीता सादर केला आहे व त्याप्रमाणे प्रार्थना करुन अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ चे लग्न गैरअर्जदारासोबत दि. ११/१२/२००९ रितीरिवाजाप्रमाणे झाले असुन त्या लग्न संबंधातुन अर्जदार क्र. २ व ३ यांचा जन्म झालेला आहे. लग्न झाल्यानंतर काही दिवस गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ ला चांगले वागविले व त्यानंतर घरातील किरकोळ कारणावरून अर्जदार क्र. १ हिचा शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ करण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार हे दारु पिवुन अर्जदार हिला त्यांच्या आईच्या सांगण्यावरुन बेदम मारहाण करित असे व घराबाहेर हाकलुन देत असे. अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार यांनी दि. १५/०६/२०२१ रोजी बेदम मारहाण करुन घरातुन हाकलुन दिले व पुन्हा त्यांची चौकशीसुध्दा केली नाही. तेव्हापासुन अर्जदार क्र. १ ते ३ अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी राहत आहेत. अर्जदार क्र. १ कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही.

३. गैरअर्जदार यास मौजे वरुड येथे ४ एकर बागायती शेती असुन संपुर्ण शेती गैरअर्जदार यांच्या नावार आहे. सदर शेतीमध्ये गैरअर्जदार नगदी पिके घेत

असुन यापासुन त्यांना रु.५,००,०००/- वार्षिक उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदार यांच्यावर अर्जदारांशिवाय इतर कोणीही अवलंबुन नाही. म्हणुन अर्जदार क्र. १ ते यांना दरमहा रु. २५,०००/- अंतरीम खावटी मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. गैरअर्जदाराने अर्जाला व नि. क्र. ०५ ला नि. क्र. ११ अन्वये लेखी जबाब दाखल करुन त्यांचे परस्पराशी असलेले नातेसंबंध मान्य करुन इतर बाबी अमान्य असे नमुद केले आहे की, अर्जदार क्र. १ ही लग्नानंतर स्वतःच्या मनाने माहेरी वारंवार जात असे व सासरीच्या घरातील जबाबदा-या पार पाडण्यास टाळाटाळ करित असे. अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना 'तु बैलासारखा घरी बसुन राहतो, कोणताही व्यवसाय अथवा नोकरी करित नाहीस, माझ्या माहेरची आर्थिक परिस्थीती उत्तम असुन मी तुझ्यासोबत नांदु शकत नाही' असे अपमानास्पद वक्तव्य करुन गैरअर्जदाराचा मानसिक छळ करित असे.अर्जदार क्र. १ हीने स्वतःहुन कोणत्याही वैध कारणाशिवाय माहेरी राहणे पसंत केले असुन तिने स्वेच्छेने गैरअर्जदाराचा सहवास सोडला आहे. उलट, गैरअर्जदाराने वारंवार अर्जदारास परत येण्याचे आवहान केले, परंतु अर्जदार व तिचे नातेवाईक गैरअर्जदाराशी अकारण वाद घालुन तडजोडीस नकार देत आहेत.

५. अर्जदारांच्या व गैरअर्जदाराच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जदाराचा अर्ज पाहता खालील मुद्दे या न्यालयाच्या विचारासाठी उपस्थित झाले आहे. त्यावर निष्कर्ष हया न्यायालयाने खालील नमुद कारणमीमांसाच्या आधारावर नोंदविला आहे.

| अं.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे प्रथमदर्शनी गैरअर्जदाराने त्यांचा विनाकारण दुर्लक्ष व पालनपोषणास नकार दिलेला आहे काय व त्यामुळे अर्जदार ही अंतरीम खावटी मिळण्यास पात्र आहे काय, असल्यास किती ? | : | **अंशतः होकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## – कारणमिमांसा –

७. **मुद्दा क्र.१ करीताः–** अर्जदारांनी त्यांची मागणी सिध्द करण्यासाठी छापील प्रथम खबर ची प्रत, अर्जदार क्र. १ यांचे वैद्यकीय दाखले व प्रतिज्ञालेखाची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच, अर्जदार यांनी निशाणी क्र. १३ लगत मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच, अर्जदार यांच्या विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादाच्या पृष्टयार्थ मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या महत्वपुर्ण न्यायनिवाडयांचा सारांशाची प्रत अभिलेखावर निशाणी क्र. १५ अनव्ये दाखल केली आहे. सदर न्यायानिर्णयांचे संदर्भ लक्षात ठेवुन मी खालील प्रमाणे प्रस्तुत अर्जाची कारणमिमांसा करित आहे.

८. गैरअर्जदाराने निशाणी क्र. १४ लगत मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.

९. प्रस्तुत प्रकरणाची पाहणी केली. उभयपक्षातर्फे परस्परातील नातेसंबंध नाकारण्यात आलेले नाहीत. अर्जदार क्र. १ ते ३ हे माहेरी राहत

असल्याबाबतची बाब देखील नाकारण्यात आलेली नाही. तसेच, अर्जदार क्र. १ ते ३ हे माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदार यांनी तीच्या पालन पोषणासाठी मदत केल्याबाबतचे कथन देखील गैरअर्जदार याचे नाही. अर्जदारांचा सांभाळ करण्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी देखील गैरअर्जदारवर आहे.

**१०.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिज्ञालेखावर दाखल केलेला आहे. प्रथमदर्शनी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिज्ञालेखावर दाखल केलेला असून कोणतीही स्त्री संयुक्तीक कारणाशिवाय तिच्या माहेरी राहत नाही, असे वाटत नाही.

**११.** जेव्हापासुन अर्जदार हे अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत आहे, तेव्हापासून गैरअर्जदाराने त्यांना नांदविण्याविषयी कोणतेही पाऊल उचलल्याचे दिसून येत नाही. तसेच, त्यांना आर्थीक मदत केल्याचे देखील कथन नाही.

**१२.** अर्जदाराने गैरअर्जदार यांची ४ एक बागायती शेती असुन त्यापासुन त्यांना वार्षिक रु.५,००,०००/- उत्पन्न मिळते, असे कथन केले आहे. परंतु याबाबत कोणतेही दस्ताऐवज दाखल केले नाही.

**१३.** याउलट, गैरअर्जदाराचे असे कथन की, त्यांच्याकडे कोणतीही कायमस्वरुपाची नोकरी किंवा व्यवसाय नाही. ते स्वतःचे शेतात तसेच, दुस-याच्या शेतात मजुरी करुन उदरनिर्वाह करतात. सदरचे कथन जरी गृहीत धरले व आजचे मजुरीचे दर विचारात घेता गैरअर्जदार हा महिन्याला वीस ते तीस हजार रुपये कमावितो. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदारांना खावटी देण्यास सक्षम, पात्र आहे, असे गृहीत धरल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

**१४.** सबब, अर्जदार व गैरअर्जदार यांची सामाजीक स्थिती व आर्थीक उत्पन्न, गरजा व वर केलेली चर्चा लक्षात घेता हे न्यायालय मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. त्यामुळे अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ व ३ यांना दरमहा रु. ७,०००/- (सात हजार रुपये फक्त) अंतरीम खावटी म्हणुन द्यावे.

**१५.** **<u>मुद्दा क्र.२ करीताः-</u>** मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ ते ३ यांना दरमहा रु. ७,०००/- (सात हजार रुपये फक्त) अंतरीम खावटी म्हणून द्यावे. |
| ३. | आदेशाची प्रत उभयपक्षांना विनामुल्य देण्यात यावी. |

CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Digitally signed by CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Date: 2026.02.13 11:50:17 +0530

**ठिकाणः- शिरुर** **(सी. एम. खारकर)**
दि. १३/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्या. क्र. ४).
घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे.